नियमीत दिवाणी दावा क्रमांक ३७/२०२०

निशाण क्रमांक ८५ / क

वादी तर्फे साक्षीदार क्रमांक ३

| | | |
|---|---|---|
| नाव | - | डॉ. निलीमा अमृत धबाले |
| वय वर्षे | - | ३८ वर्षे |
| व्यवसाय | - | वैदयकिय अधिकारी |
| राहणार | - | हलकर्णी, गडहिंग्लज, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर |

वादी तर्फे वकील आर. आर. चव्हाण यांचे मार्फत सरतपास सुरु

१. मी सन २०१८ पासून वैदयकिय अधिकारी म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्र, हलकर्णी येथे कार्यरत आहे. मला या प्रकरणात साक्ष देण्याकरीता साक्षी समन्स प्राप्त झाले आहे. सन २०१८ साली पंचायत समिती, नांगनूर यांचे मला अहवाल दया म्हणून पत्र आले होते. ते पत्र मला पंचायत समिती, गडहिंग्लज कडून आले होते. नांगनूर या गावातील संडास व मुतारी याचे परिक्षण करण्याचे पत्र होते. सदरील मुतारी ही राम हायस्कूलच्या उत्तर बाजूस होती. दिनांक २५/१/२०१८ रोजी आम्ही पाहणी करण्याकरीता गेलो. माझ्या सोबत आरोग्य परिवेक्षक हे देखील होते. मी प्रत्यक्ष सदरील जागेवर गेले होते. तेथे गेल्यानंतर संडास मुतारी पॅकबंद होती व तेथे स्वच्छता होती असे आढळून आले. त्या जागेच्यापरिसराची आम्ही पाहणी केली. तेथे स्वच्छता आढळून आली. सदरील मुतारीचे आउट लेट बघण्यात आले ते जमीनी खालून गेल्याचे आढळून आले. सदरील पॅकबंद मुतारी आरोग्य सहाय्यक अधिकारी यांनी उघडून बघीतली त्यामध्ये देखील स्वच्छता आढळून आली. ज्या वेळेस मी गेले त्यावेळेस त्या ठिकाणी स्वच्छता आढळून आली व दुर्गंधी आढळून आली नाही. त्यानंतर प्राथमिक आरोग्य केंद्र हलकर्णी येथे येवून त्याबाबतचा अहवाल पंचायत समिती, गडहिंग्लजला त्याच दिवशी पाठवून दिला. सदरील अहवाल मला दाखविल्यास तो मी ओळखू शकते. मला आता सदरील अहवाल दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी स्वाक्षरी आहे.

सदरील अहवालातील मजकूर वस्तुस्थिती प्रमाणे बरोबर आहे. त्यास निशाणी क्रमांक ८६ देण्यात येते.

सरतपासपूर्ण.

प्रतिवादी क्रमांक ७ तर्फे वकील एम. व्ही. पाटील यांचे मार्फत उलट तपास सुरु

२. मी सन २०१३ ला एमबीबीएस झाले. दिनांक २ ऑगस्ट २०१८ रोजी माझी नियुक्ती प्राथमिक आरोग्य केंद्र, हलकर्णी येथे झाली. ऑगस्ट २०१८ पूर्वी मी कंत्राटी पध्दतीने जिल्हा परिषद येथे कार्यरत होते हे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा मी प्रकरणात दाखल करु शकते. हे म्हणणे बरोबर आहे की, कंत्राटी पध्दतीने नोकरी करीत असताना संबंधीत संस्थेला, जिल्हा परिषदेला बॉन्ड लिहून दयावा लागतो. हे म्हणणे बरोबर आहे की, सदरील बॉन्ड हा १ वर्षे व जास्तीत जास्त २ वर्षा पर्यंत लिहून देता येतो, त्यापेक्षा जास्त लिहून देता येत नाही. सन २०१३ नंतर मी एक वर्ष इंटरशिप केली. मी माझे एमबीबीएस चे शिक्षण हे रशिया मधून घेतलेले आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, विदेशातून एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण केल्यांनतर भारतामध्ये प्रॅक्टीस करण्यासाठी एक परिक्षा दयावी लागते. मला निश्चीतपणे मी, ती परिक्षा कधी पास हे मला आठवत नाही. दिनांक २/८/२०१८ पूर्वी मी कंत्राटी पध्दतीने प्राथमीक आरोग्य केंद्र, हलकर्णी येथेच कार्यरत होते. दिनांक २५/१/२०१८ रोजी मी वैदयकिय अधिकारी म्हणून कार्यरत होते हे दर्शविणारा जिल्हा परिषदेचा किंवा पंचायतीचा दस्त मी हजर करु शकते.

प्रश्न - दिनांक २/८/२०१८ पूर्वी कंत्राट बेसीस वर काम करण्याकरीता बॉन्ड लिहून दिला होता का ?

उत्तर - आमचा केवळ ११ महिन्याकरीता बॉन्ड लिहून घेतला होता. त्यानंतर आमचा बॉन्ड लिहून घेतला नाही.

३. सन २०१८ साली ११ महिन्याचा बॉन्ड माझ्याकडून लिहून घेतला होता. मी सन २०१३ ते पहिला बॉन्ड लिहून देई पर्यंत कुठे दुसरीकडे वैदयकिय अधिकारी म्हणून कार्यरत नव्हते. हे म्हणणे बरोबर आहे की, सदरील बॉन्ड हा जिल्हा परिषद सीओ याच्या नावाने लिहून दयावा लागतो. हे म्हणणे बरोबर आहे की, सदरील बॉन्डचा ताबा हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे असतो.

४. आम्ही निरीक्षणाला गेलो त्यावेळेस आरोग्य सहाय्यक हे शिवमुर्ती रामू बदामे हे आमच्या सोबत होते. ते प्राथमिक आरोग्य केंद्र, हलकर्णी येथे होते. निरीक्षक कोण होते हे मला आता आठवत नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, शिवमुर्ती रामू बदामे हे माझ्यापेक्षा वरीष्ठ होते. हे म्हणणे बरोबर आहे की, जानेवारी २०१८ मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र, हलकर्णी येथे एकच वैदयकिय अधिकारी यांची नियुक्ती होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस आरोग्य केंद्रा मध्ये येणा-या रुग्णाचे उपचार बदामे करीत होते.

५. मी अहवाल हा संरपच / ग्राम सेवक, ग्रामपंचायत, नांगनूर यांना अड्रेस केला आहे. (साक्षीदार स्वताहून सांगते की, त्याची प्रतीलीपी गट विकास अधिकारी यांना दिली आहे.) मला सरंपच / ग्राम सेवक, ग्रामपंचायत, नांगनूर याचे पत्र आले होते हे माझ्या आता लक्षात नाही. वादातील संडास व मुतारी ही कुठल्या गट नंबर मध्ये आहे हे सांगणारा कुठला पत्र व्यवहार झाला होता का हे मला आज आठवत नाही. गट विकास अधिकारी यांनी संडास व मुतारी याचा नकाशा पत्रासोबत दिला नव्हता. फोटो दिले होते का हे माझ्या लक्षात नाही. संडास व मुतारी कुठल्या गट नंबर मध्ये आहे किंवा त्याबाबतचा नकाशा देण्यासदंर्भात मागणी पत्र मी गट विकास अधिकारी यांना केले नाही. नांगनूर गावातील कुठलाही गावकरी मी निरीक्षणाचे वेळी घेतला नाही. नांगनूर संकेश्वर रस्ता पश्चीमेकडून उत्तरेकडे गेला आहे. त्या रस्त्याच्या कुठल्या दिशेस राम हायस्कूल आहे हे मला आठवत नाही. मी ज्या ठिकाणी निरीक्षण केले तेथून साधारणता १ कि.मी. अंतरावर घरे होती. मी मराठी मध्ये संगणकावर किंवा टाईप राईटरवर टंकलेखानाचे काम करीत नाही.

प्रश्न - मुख्यालय सोडताना त्याबाबतची नोंद रजिस्टरला घ्यावी लागते ?

उत्तर - वैदयकिय अधिकारी यांना त्याबाबतची नोंद घ्यावी लागत नाही.
ती नोंद कर्मचारी यांना घ्यावी लागते.

६. हे म्हणणे खरे नाही की, अधिकारी व कर्मचारी यांची बायो मेट्रीक हजेरी घ्यावी लगाते. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येक आरोग्य केंद्रा मध्ये हालचाल रजिस्टर ठेवले जाते. हे म्हणणे खरे नाही की, त्या रजिस्टर मध्ये वैदयकिय अधिकारी यांना त्याच्या नोंद कराव्या लागतात. हे म्हणणे खरे नाही की, गट विकास अधिाकारी यांचेकडून मुख्यालय सोडताना परवानगी घ्यावी लागते. सदरील परवानगी ही तालुका आरोग्य अधिकारी यांची घ्यावी लागते. दिनांक २५/१/२०१८ रोजी डॉ. अथणी हे तालुका आरोग्य अधिकारी म्हणून कार्यरत होते. तालुका आरोग्य अधिकारी याची मी जाण्या आगोदर परवानगी घेतली नाही. दिनांक २५/१/२०१८ रोजी कुठल्या वैदयकिय अधिाकरी यांनी पाहणी केली आहे का याची मी चौकशी केली नाही.

७. संडास व मुतारीचे व्दार कुठल्या दिशेने होते हे मला सांगता येत नाही. तसेच संडास व मुतारीची लांबी व रुंदी देखील सांगता येत नाही. ज्या ठिकाणी पाहणी केली त्याठिकाणी एकूण संडास व मुतारी किती होते हे मला आठवत नाही. निशाणी क्रमांक ८६ वरील मजकूर हा बदामे यांनी टाईप केला. बदामे हे सध्या आरोग्य विभागात कार्यरत आहेत. मी माइया स्वताच्या हस्ताक्षरात त्यांना सदरील मजकूर मराठीत लिहून दिला होता. माइया हस्ताक्षरात लिहलेला अहवाल टाईप झालेल्या अहवाला सोबत पाठवला नाही. मुतारी पासून राम हायस्कूलची इमारत ही ५० फुट अंतरावर आहे. राम हायस्कूल हे पूर्व पश्चिम किंवा उत्तर दक्षिण कसे आहे हे मला आठवत नाही. संडास व मुतारी हया एकमेकांना चिटकून होत्या.

८. (साक्षीदार यांना छायाचित्र दाखविण्यात आले. ते छायाचित्र राम हायस्कूलचे असल्याचे त्यांनी मान्य केले. सबब त्यास निशाणी क्रमांक ८७ देण्यात येते. साक्षीदारास दुसरे छायाचित्र दाखविण्यात आले व ज्या ठिकाणी निरीक्षण करण्यात आले ते हेच ठिकाण का हा प्रश्न विचारण्यात आला. मला दाखविण्यात आलेले छायाचित्रातील ठिकाण हे तेच आहे, ते ज्या ठिकाणी मी निरीक्षण करण्यास गेले होते. त्यास निशाणी क्रमांक ८८ देण्यात येते. मला ते ठिकाण आठवते परंतु सदरील ठिकाणावरची परिस्थिती सध्या मला आठवत नाही. मला आता जे छायाचित्र दाखविण्यात आले त्या छायाचित्रात असलेली स्थिती व मी ज्या दिवशी निरीक्षण करण्यास गेले त्यावेळची स्थिती वेगळी होती. सदरील छायाचित्रास निशाणी क्रमांक ८९ देण्यात येते. निशाणी क्रमांक ८९ वरील रस्ता हा कुठल्या दिशेने जात आहे हे मला सांगता येत नाही. मी ज्या वेळेस निरीक्षणास गेले त्यावेळेस फोटो मध्ये दाखविण्यात आलेली नाली अस्तीत्वात नव्हती. हे म्हणणे बरोबर आहे की, निशाणी क्रमांक ८९ वरील संडास मुतारीचे व्दार हे रस्त्याचे बाजूने दिसत नाही.

९. दिनांक २५/1/२०1८ नंतर स्थळ निरीक्षण करण्याकरीता दुस-या कामात मी गेली आहे. निरीक्षण केल्यानंतर जागेचा पंचनामा करावा लागतो याबाबत मला माहिती नाही. संडास व मुतारीचे आउट लेट हे रस्त्याबाजूने जमीनी खालून गेलेले होते.

1०. माझे माहेर सांगली आहे. दिनांक २५/1/२०1८ पूर्वी मला निरीक्षण स्थळ माहिती नव्हते. मला आरोग्य सहाय्यक यांनी दिनांक २५/1/२०1८ रोजी निरीक्षण स्थळ दाखविले. आरोग्य सहाय्यक यांना मला आलेल्या पत्राबाबत माहिती दिली होती. आरोग्य सहाय्यक यांची हालचाल रजिस्टरला नोंदद घ्यावी लागते. आरोगय सहाय्यक यांना मुख्यालय सोडण्याकरीता वरीष्ठाची परवानगी घ्यावी लागते. आरोग्य सहाय्यक यांनी सदरील दिवशी मुख्यालय सोडण्याकरीता वरीष्ठाची परवानगी घेतली होती. त्यांना वरीष्ठाची परवानगी मिळाले बाबतचे पत्र

मला दिले होते. सदरील पत्राची स्थळ प्रत किंवा परवानगी पत्र मी शोधून दाखल करु शकते. नांगनूर गावचे सरपंच विकास मोकाशी माझ्या परीचयाचे नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, तत्कालीन नांगनूर संरपच यांना मदत व्हावी याकरीता संगणमताने सदरील अहवाल दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्रमांक ८६ वरील अहवाल मी कार्यालयात बसून तयार करुन सादर केला आहे.

प्रतिवादी क्रमांक ७ तर्फे उलटतपास संपला.

प्रतिवादी क्रमांक २, ५ व ६ तर्फे वकील एस. बी. चोथे यांचे मार्फत उलट तपास सुरु

प्रतिवादी क्रमांक २, ५ व ६ यांनी प्रतिवादी क्रमांक ७ चा उलट तपास स्वीकारला.

प्रतिवादी क्रमांक १,३ व ४ पुकारता गैरहजर तर्फे वकील पुकारता गैरहजर. सबब त्यांचे विरुध्द उलट तपास नाही.

उलटतपास संपला.
फेरतपास नाही.
वा.दा.का.दा.

श्रवणोत्तर स्विकृत

दिनांक ०८/१०/२०२५

सही/-

( न.श्री.पुरी )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
गडहिंग्लज